**प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे सा.क्र.२**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** दयानंद कृष्णा अष्टेकर.

**वय** - ५७ वर्ष, **व्यवसाय** - नोकरी,

**नेमणूक** - उपकार्यकारी अभियंता, महावितरण, उपविभाग आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**प्रतिवादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मी दि.०६.११.२०२४ रोजी पासून उपविभाग आजरा येथे कार्यरत आहे. मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मी त्याप्रमाणे कृष्णा दाजी पाटील, रा. किणे, ता. आजरा यांच्याबाबतची कागदपत्रे आज सादर केली आहेत. मला कृष्णा दाजी पाटील यांना विजपुरवठा केल्याबाबतची कागदपत्रे आणण्यास आदेश करण्यात आला होता. कृष्णा पाटील यांनी आमच्या विभागाकडून १९९२ आणि १९९६ साली विजकनेक्शन घेतले होते. त्यावेळी शासनाची एम. एस. ई. बी. कंपनी कार्यरत होती.

२. शासनाच्या कंपनीचे २००५ साली महावितरणमध्ये विभाजन झाले आहे. त्यामुळे कृष्णा पाटील यांच्या विजजोडणी बाबतची मूळ कागदपत्रे आजरोजी मिळून येत नाहीत. त्यामुळे आम्ही कृष्णा पाटील यांचे विजबिल तपासले आहे. त्याप्रमाणे कृष्णा पाटील याने बोअरवेल आणि विहिरसाठी दोन वेगवेगळे कनेक्शन घेतले आहेत. त्याबाबतच्या नोंदी आमच्या कार्यालयाच्या संगणक प्रणालीत घेतलेल्या आहेत. मी त्यावरुन कृष्णा पाटील याच्या नावे असलेल्या मार्च २०२५ ची दोन विजदेयके आज सादर केली आहेत.

३. आता मला आमच्या कार्यालयातील संगणकातील जतन करुन ठेवलेल्या विजबिलाच्या मी दाखल केलेल्या दोन प्रमाणित प्रती व भा. सा. अधिनियम कलम ६३ प्रमाणे प्रमाणपत्र दाखवले, त्यावरती माझी स्वाक्षरी असून नाव व हुद्दा आहे. त्यातील सर्व मजकूर बरोबर आहे. त्यामुळे सदर प्रमाणपत्राला **नि. क्र.२०६** देण्यात येतो. आता मला मी सादर केलेले कृष्णा पाटील याच्या नावे असलेल्या दोन विजपुरवठयाची देयके दाखवली. कृष्णा पाटील याला ग्रा. क्र. २५५३९०१२४४२१ चा पुरवठा दि.०९.०५.१९९२ रोजी आणि ग्रा. क्र. २५५३९०१२४६९२ चा पुरवठा दि.१४.१२.१९९६ रोजी करण्यात आलेला आहे. आता मला त्या विजबिल देयकाच्या मी सादर केलेल्या प्रमाणित प्रती दाखवल्या.

४. त्या मी कार्यालयातील संगणकामधून काढलेल्या असून प्रमाणित केलेल्या आहेत. त्यावरती माझी स्वाक्षरी व हुद्दा आहे. त्यांना अनुक्रमे **नि. क्र.२०७ व २०८** देण्यात येतात.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.**

५. माझे बी. ई. इलेक्ट्रीकलचे शिक्षण झालेले आहे. मी नोकरीस लागलो तेव्हा एम. एस. ई. बी. च्या वितरण विभागात काम करत होतो. मला इलेक्ट्रीसिटी सप्लाय कोड बाबत माहिती असून आम्हाला त्याप्रमाणे काम करावे लागते. त्यातील तरतूदी प्रमाणे आमच्या कार्यालया मार्फत विजपुरवठा केला जातो. विजपुरवठा करण्यासाठी कायदेशीर मालकीची कागदपत्रे घ्यावी लागतात.

६. विजपुरवठा करण्यापूर्वी ग्राहकाकडून विजमागणी अर्ज, शपथपत्र, करारनामा आणि हमीपत्र घ्यावे लागते. शेतक–याला शेतीसाठी विजपुरवठा हवा असल्यास त्याबाबत जमिनीचा ७/१२ उतारा घ्यावा लागतो. सदर ७/१२ उता–यावरती इतर सहहिस्सेदार असल्यास त्यांची मान्यता किंवा तातडीने विजपुरवठा करावयाचा असल्यास शेतक–याकडून करारनामा लिहून घ्यावा लागतो. आम्ही ७/१२ च्या नोंदीवरुन विहिरीला विजपुरवठा करतो. हे म्हणणे खरे नाही की, शेतीसाठी विजपुरवठा करावयाचा असल्यास पाणीपरवाना घ्यावा लागतो. मी आज सादर केलेल्या नि. क्र.२०७ व २०८ च्या बिलांवरती गट क्रमांक नमूद नाही. मला ते कोणत्या गटातील आहे याबाबत सांगता येणार नाही.

७. माझे स्वतंत्र असे संगणकाचे प्रशिक्षण झालेले नाही. आमच्या कार्यालयाचे डाटा सेंटर मुंबईला आहे, त्यावरती आमचे नियंत्रण नाही. मला आमच्या डाटा सेंटरमध्ये कधीपासूनची विजबिले जतन केली आहेत याबाबत सांगता येणार नाही. आमच्या कार्यालयाच्या बिलींग विभागासाठी स्वतंत्र डाटा ऑपरेटर असून तो बिले काढण्याची कामे करतो. मी प्रत्यक्ष बिलिंगचे काम करत नसून त्यावरती नियंत्रण ठेवतो.

८. मी मार्च २००० पूर्वीचा अभिलेख आज सोबत आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीशी संगनमत करुन नि. क्र.२०७ व २०८ ची खोटी बिले सादर केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कृष्णा पाटील याने कोणताही विजपुरवठा घेतलेला नसताना मी त्याबाबतची खोटी बिले सादर करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २४.०७.२०२५.    (आर. पी. थोरे)

आजरा.    दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

**प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे सा.क्र.३**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव —** अमीर अब्दूल लतीफ.

**वय** - ४७ वर्ष, **व्यवसाय** - बॉड रायटर,

**रा.** - आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**प्रतिवादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मी २००४ सालापासून दस्तलेखकाचे काम करत असून माझे आजरा तहसिल आवारामध्ये कार्यालय आहे. मी व माझा भाऊ समीर तेथे काम करतो. समीरकडे मुद्रांक विक्रीचा परवाना आहे. मी कृष्णा रामू कुंभार आणि प्रतिवादी क्र.१ ते ४ व १० यांना ओळखत होतो. ते खरेदीपत्राचा दस्त करण्यासाठी माझ्याकडे आले होते. प्रतिवादी क्र.१ ते ४ गट क्र.३३० मधील २.०२ आर जमीन कृष्णा रामू कुंभार याला विकण्यासाठी दि.११.०४.२००८ रोजी ते माझ्याकडे आले होते.

२. त्यांनी माझ्या भावाकडून खरेदीपत्राचा स्टँप घेतला होता. त्यांनी सोबत ७/१२, आठ अ उतारा, ईनामपत्रक उतारा, प्रतिज्ञापत्र आणि मतदान ओळखपत्र आणले होते. त्यांच्या सोबत प्रविण गुडूळकर आणि गणपतराव देसाई असे दोन साक्षीदार आले होते. मी त्यांच्याकडून माहिती घेऊन माझ्या कार्यालयातील संगणकावरती खरेदीदस्त तयार करुन त्यांना वाचून दाखवला होता. त्यांनी तो बरोबर असल्याचे मान्य करुन प्रतिवादी क्र.१ ने तिचा निशाणी अंगठा व इतर प्रतिवादींनी स्वाक्ष-या केल्या होत्या. मी प्रतिवादी क्र.१ च्या अंगठयाला दस्तूर दिला होता. त्यानंतर त्यावरती लिहून घेणार- देणार, मान्यतादार आणि साक्षीदार यांनी माझ्या समक्ष स्वाक्ष-या केल्या होत्या. मी त्यावरती दस्तूर म्हणून माझी स्वाक्षरी करुन नाव टंकलिखित केले आहे.

३. त्यानंतर ते सर्व दस्त घेऊन दुय्यम निबंधक कार्यालयात गेले होते. मला तो मूळ दस्त दाखवल्यास ओळखता येऊ शकतो. आता मला तो दस्त दाखवला, तो तोच असून मी तयार केलेला आहे. त्यावरती दस्तूर म्हणून माझे नाव व स्वाक्षरी आहे. मी त्यावरील सर्वांच्या स्वाक्ष-या व अंगठा ओळखत असून त्यातील मजकूर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या सांगण्याप्रमाणे बरोबर लिहिलेला आहे. त्याला **नि. क्र.२१०** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादी तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.</u>**

**४.** माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मुद्रांकविक्री व दस्तलेखन हे दोन वेगवेगळे व्यवसाय आहेत. केवळ मुद्रांक विक्रीसाठी जिल्हाधिका–यांची परवानगी लागते. हे म्हणणे खरे नाही की, दस्त लेखनासाठी जिल्हाधिका–यांची परवानगी लागते. मी परवाना धारक दस्तलेखक नाही. माझे कार्यालय तहसिलदार कार्यालया समोर नसून आवारात आहे.

**५.** मी दस्त करण्यापूर्वी त्याबाबतची माहिती घेत असतो. मला नि. क्र.२१० च्या दस्ताची माहिती प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दिली होती. त्यांनी ७/१२ व आठ अ चा उतारा सोबत आणला होता. त्यांनी मला दिलेल्या ७/१२ उता–यावरती त्यांच्या नावे स्वतंत्र क्षेत्र नमूद नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो, आठ अ मध्ये स्वतंत्र क्षेत्र होते. हे म्हणणे खरे नाही की, ७/१२ उता–यावरती स्वतंत्र क्षेत्राची नोंद नसल्यास त्यावरील सर्व हिस्सेदारांची संमती घ्यावी लागते.

**६.** वर्ग–२ च्या जमिनीच्या विक्रीबाबत शासनाची परवानगी घ्यावी लागते. त्यावेळी गरज नसल्यामुळे सदर विक्रीसाठी शासनाच्या परवानगीची गरज नव्हती. सदर दस्त करतेवेळी त्याच्या सोबत घेणार– देणार व साक्षीदारांची ओळखपत्रे जोडणे बंधनकारक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गुंठेवारीचा व्यवहार करण्यासाठी शासनाची लेखी परवानगी आवश्यक असते. माझ्या समक्ष दस्तातील व्यवहाराची देवाण– घेवाण झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.११.०८.२००४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ च्या सांगण्याप्रमाणे कोणताही दस्त तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २४.०७.२०२५.
आजरा.

(आर. पी. थोरे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

**प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे सा.क्र.४**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – सच्चीदानंद निळकंठ कुलकर्णी.

**वय** - ५५ वर्ष, **व्यवसाय** - बॉड रायटर,

**रा.** - काजूबाग, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**प्रतिवादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मी २००० सालापासून दस्तलेखकाचे आजरा येथे काम करत असून माझे आजरा तहसिल आवारामध्ये कार्यालय आहे. माझ्याकडे सन २००० सालचा मुद्रांक विक्रीचा परवाना आहे. मी त्यासोबत दस्तलेखनाचे काम करतो. माझे एम. ए. पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मी संगणकावरती दस्त तयार करतो. मी मुकुंद रामू कुंभार आणि प्रतिवादी क्र.१० यांना ओळखतो. ते किणे गावच्या जमिनीचा खरेदीपत्राचा दस्त करण्यासाठी दि.१०.०५.२०१० रोजी माझ्याकडे कार्यालयात आले होते.

**२.** त्यांना गट क्र.३३० मधील जमिनीचे खरेदीपत्र करायचे होते. त्यासाठी रामा दाजी पाटील याने माझ्याकडून खरेदीपत्राचा स्टँप विकत घेतला होता. त्याने मला विक्रीचा दस्त तयार करायला सांगितला होता. मी त्याप्रमाणे संगणकावरती दस्त तयार करुन त्याला वाचायला दिला होता. तो लिहून देणार व घेणार यांनी बरोबर असल्याचे मान्य करुन त्यावरती स्वाक्षरी केली होती. त्या दस्ताला कृष्णा रामू कुंभार व लक्ष्मण बाबू गुरव यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्ष–या केल्या होत्या. त्यावरती मी दस्त लिहिणार म्हणून माझी स्वाक्षरी केली होती.

**३.** मला तो मूळ दस्त दाखवल्यास ओळखता येऊ शकतो. आता मला तो दस्त दाखवला, तो तोच असून मी तयार केलेला आहे. त्यावरचा मुद्रांक रामू पाटील याने खरेदी केला असून विक्रेता म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्यावरती दस्त तयार करणार म्हणून माझे नाव व स्वाक्षरी आहे. मी त्यावरील लिहून देणार– घेणार व साक्षीदारांच्या स्वाक्ष–या ओळखतो. त्या स्वाक्ष–या त्यांनी माझ्या समक्ष केल्या असून त्यातील मजकूर त्यांच्या सांगण्याप्रमाणे बरोबर लिहिलेला आहे. त्याला **नि. क्र.२१२** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.**

**४.** मुद्रांकविक्री व दस्तलेखन हे दोन वेगवेगळे व्यवसाय आहेत. केवळ मुद्रांक विक्रीसाठी जिल्हाधिका–यांची परवानगी लागते. रामू दाजी पाटील याने खरेदीपत्रासाठी ७/१२, आठ अ, ईनामपत्रक आणि मतदान ओळखपत्राची कागदपत्रे आणली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखत करताना विक्री जमीन वर्ग– २ ची असल्यामुळे जिल्हाधिका–यांची परवानगी आवश्यक होती.

५. मला दिलेल्या ७/१२ उता–यावरती सामाईकात ब–याच खातेदारांची नावे होती. माझ्याकडे त्यांनी उता–यावरील खातेदारामंध्ये वाटप झाल्याचा कोणताही पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, गुंठेवारीच्या खरेदीसाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. सदर दस्तातील आर्थिक व्यवहार माझ्यासमक्ष झाला होता. त्यावेळी असलेल्या बाजारमूल्या प्रमाणे ३०,०००/– रुपये देण्यात आले होते.

६. खरेदीपत्रातील मिळकतीबाबत स्वतंत्र आठ अ उतारा असल्यामुळे मी ७/१२ उता–यावरील सर्व हिस्सेदारांची संमतीपत्रे घेतली नव्हती. मी त्या मिळकतीचा स्वतंत्र आठ अ उतारा कसा झाला याबाबतची कागदपत्रे पाहिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी नि. क्र.२१२ च्या दस्ताला लिहून देणार व घेणार यांची ओळखपत्रे जोडलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा व बनावट दस्त तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र दाजीबा पाटील आणि रामा दाजी पाटील या दोन वेगवेगळया व्यक्ती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २४.०७.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.